Gomantak

CM inaugurates 'Samriddhi 2009'

Date: 30-08-2009 | Edition: Goa | Page: 9 | Source: Bureau | Clip size (cm): W: 17 H: 15

Clip: 1 of 1

# 'देशाला महासत्तेकडे नेण्यासाठी उद्योजकांनी हातभार लावावा'

## हडफडे येथे 'तृतीय समृद्धी २००९' परिषदेचे उद्घाटन

पणजी, ता. २९ (प्रतिनिधी) : भारताला महासत्तेकडे नेण्यासाठी प्रत्येकाने आपल्याकडील संपत्तीचा थोडासा वाटा सामाजिक विकासासाठी द्यावा. वैयक्तिक विकास साधताना राष्ट्राच्या विकासाचा, सामाजिक बांधिलकीचा विसर पडता कामा नये हे विचार युवकांमध्ये रुजणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री दिगंबर कामत यांनी आज हडफडे येथे केले.

गोवा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांनी हडफडे येथे आयोजित केलेल्या 'तृतीय समृद्धी २००९' परिषदेच्या उद्घाटनानंतर ते बोलत होते. सामाजिक उद्यमशीलता ही या परिषदेची संकल्पना आहे. दोन दिवसांच्या या परिषदेला आज प्रारंभ झाला.




**हडफडे येथे समृद्धी परिषदेचे शनिवारी उद्घाटन करताना मुख्यमंत्री दिगंबर कामत. बाजूस पीटर डिलिमा व विद्यार्थी.**

आविष्कार इंडिया मायक्रो व्हेंच्युअर कॅपिटल फंडचे इन्व्हेस्टमेंट बोर्डचे अरुण डियाझ, वात्सल्य हेल्थ केअरचे सहसंस्थापक डॉ. अश्विन नाईक, ओऑसिसचे संस्थापक प्रदीप घोष, बंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अभ्यास मंडळाचे डीन त्रिलोचन शास्त्री, अशोका इनोवेशन्सच्या सोहिनी भट्टाचार्य, डेसिक्रू सोल्युशन्सच्या सीईओ सोनाली मल्होत्रा, निदानचे अरबिंद सिंग इत्यादींचे मार्गदर्शन या परिषदेला लाभणार आहे.

गोवा सरकारने सामाजिक सुरक्षा योजनेद्वारे समाजाच्या गरजवंत घटकांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला आहे आणि बिकासाची चांगली गती गाठली आहे. परंतु योजना आयोगाकडून राज्याला सापत्न भावाची वागणूक मिळते. गोव्याचा सामाजिक विकास पाहून राज्याला केंद्रीय निधी मिळावा अशी मागणी त्यांनी केली. उद्योजकांनीही गोव्याच्या सामाजिक विकासाला मोठ्या प्रमाणात भागीदार होऊन हातभार लावण्याची गरज आहे. सार्वजनिक जागेत कचरा न टाकण्याचीही जबाबदारी प्रत्येक नागरिकाने उचलण्याची वेळ आली आहे, असे आवाहन त्यांनी केले.

संपत्ती मिळवणे, गाड्या उडवणे हे युवा व्यावसायिक, उद्योजकांचे ध्येय न बनता मिळालेल्या फायद्याचा वाटा समाजापर्यंत पोचवणे आवश्यक आहे. तसेच पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी कटिबद्द राहून त्याची सुरवात करणे उद्योजकांना शक्य असल्याचे श्री. डियाझ यांनी सांगितले. गोवा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक पीटर डिलिमा यांनी स्वागत केले.